प्रत्येकाच्या कानात आणि डोळ्यात
देवाने चार बोटाचे अंतर ठेवले आहे.
त्याचे कारण जोपर्यंत एखादी घटना
तुम्ही प्रत्यक्ष पहात नाही, तो पर्यत तरी कोणाच्या
तोंडून निघालेली बातमी,
कानाने ऐकून तुमच्या तोंडाने बोलू नका !!

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १९४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२५ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## लोणार तालुक्यात आढळला दुर्मिळ काळतोंड्या साप



**अक्षराज : उद्धव आटोळे**

**दि.२४, लोणार (बुलडाणा) :** लोणार तालुक्यात आढळला दुर्मिळ काळतोंड्या साप डोके पूर्णपणे काळे असल्यामुळे याचे नाव काळतोंड्या पडले याचे इंग्लिश नाव Dumeril's Black Headed Snake असे आहे. लोणार तालुक्यातील सरस्वती गावात तांबोळा रोड वरील गट न. ५६ मधील शेतकरी सतिश सरकटे यांच्या शेतातील गोठ्यावर सापडला साप हा पूर्णपणे बिनविषारी आणि निरुपद्रवी आणि लाजाळू स्वभावाचा, जास्तीत जास्त दीड फूट लांबीचा, लालसर तपकिरी रंग पाठीवर छोट्या कळ्या ठिपक्यांची रांग, डोके काळे व त्यावर सोनेरी रंगाची नक्षी, पोटाकडील भाग हिरवट पिवळसर रंगाचा लांब गोलाकार शरीर आणि लांब निमुळती शेपूट ही या सापाची शरीर रचना. लहान पाली, सापसुरळ्या आणि छोटे साप हे याचे खाद्य, हा साप दिनचर तसेच निशाचर पण आहे. जमिनीवर दगड व लाकडी ओंडक्याखाली आढळतो आणि विशेषतः पाल्या पाचोळ्यात राहणे हा साप पसंत करतो. वन्यजीव प्रेमी व सर्पमित्र असलेले विनय कुलकर्णी आणि त्यांचे सहकारी सचिन कापूरे, कमलेश आगरकर, विजय नरवाडे आणि वन्यजीव छायाचित्रकार उमेश चिपडे यांनी या सापाच्या सविस्तर नोंदी व छायाचित्र घेतले. तदनंतर शेतकरी सतीश सरकटे यांचे समुपदेशन करून या सापाला तेथेच शेतात सोडून देण्यात आले.

सर्पदंशाचे प्रमाण ग्रामीण भागातच जास्त आहे व हे टाळण्यासाठी आपल्या घराचा परिसर स्वच्छ ठेवावा अडगळीचे समान ठेवू नये, घराच्या आसपास किंवा घरात उंदराचे बीळ असतील तर ते तत्काळ बंद करणे, घराच्या दरवाजाला जर कुठे सांदी किंवा फटी असतील तर त्या बंद कराव्यात जेणे करून साप घरात शिरणार नाहीत. शेतात जातांना आणि काम करताना पायात गम बूट घालने, जेणे करुन सर्पदंश होणार नाहीत आणि एवढ्यावर जर सर्पदंश झालाच तर कुठलेही घरगुती किंवा गावठी उपचार न करता तात्काळ ग्रामीण रुग्णालय गाठणे तेथे सर्पदंशावरील विषप्रतिरोधक औषध उपलब्ध असते, वेळेत दवाखान्यात गेल्यास माणसाचा जीव नक्कीच वाचतो असे आवाहन सर्पमित्रांनी केले आहे.

## नो रिस्क, एक जागा जवळपास फिक्स! भाजपकडून राज्यसभेवर कोणाकोणाची वर्णी?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४,** मुंबई : राज्यसभेच्या ७ जागांसाठी मार्च महिन्यात निवडणूक होणार आहे. विधानसभेत महायुतीकडे प्रचंड बहुमत असल्यानं सातपैकी सहा जागा सत्ताधाऱ्यांच्या वाट्याला जाणार आहेत. तर विरोधी बाकांवर असलेल्या महाविकास आघाडीला केवळ १ जागा जिंकता येऊ शकेल. त्यासाठी त्यांना एकजूट दाखवावी लागेल. मविआतील तीन पक्षांनी समन्वय राखला, तरच त्यांना एक जागा जिंकता येईल.

भाजपकडे सध्या विधानसभेत १३१ आमदारांचं बळ आहे. काही अपक्ष आणि लहान पक्षांचा भाजपला पाठिंबा आहे. त्यांच्या जोरावर भाजपचे ४ उमेदवार विजयी होऊ शकतात. यापैकी एक जागा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्यासाठी असेल, हे जवळपास निश्चित मानलं जात आहे. रिपाईं आठवले गटाचे अध्यक्ष असलेले रामदास आठवले केंद्रात मंत्रिपदी कायम राहू शकतात. किंबहुना त्यांना मंत्रिपदी



कायम राहण्यासाठी राज्यसभेचं सदस्य असणं महत्त्वाचं आहे.

राज्यसभेवर कोणाला संधी द्यायची याचा निर्णय भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीत घेतला जाईल. राज्यसभेवर पक्षानं निष्ठावंतांना संधी द्यावी असा सूर असल्याची माहिती उच्चपदस्थ सुत्रांनी दिली. 'वरिष्ठ सभागृहात पक्षानं निष्ठावंतांची वर्णी लावावी, असा मतप्रवाह आहे. पण या आग्रहाला आठवले अपवाद आहेत. आठवलेंच पक्ष गेल्या दशकभरापासून भाजपच्या सोबत आहे. त्यामुळे त्यांना सत्तेत वाटा दिला जाईल,' अशी माहिती सुत्रांनी दिली.

रामदास आठवले यांना संधी दिल्यास दलित समाजात सकारात्मक संदेश जाईल, असं भाजप च्या थिंक टँकला वाटतं. २०१४ मध्ये लोकसभेची निवडणूक झाली. भाजपला पहिल्यांदाच स्पष्ट बहुमत मिळालं. त्या निवडणुकीच्या आधीच भाजप आणि रिपाईं (आठवले) यांची युती झाली. आठवले यांना लोकसभा निवडणुकीनंतर राज्यसभेवर संधी देण्यात आली.

जुलै २०१६ मध्ये आठवले यांच्याकडे सामाजिक न्याय खात्याचं राज्यमंत्रिपद देण्यात आलं. २०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतरही त्यांचं मंत्रिपद कायम राहिलं. मार्च २०२० मध्ये आठवले यांचा राज्यसभेचा कार्यकाळ संपला. भाजपनं त्यांना आपल्या कोट्यातून पुन्हा संधी दिली. ते पुन्हा खासदार झाले. आता त्यांचा कार्यकाळ २ एप्रिलला संपणार आहे.

आठवलेंची खासदारकी निश्चित मानली जात आहे. त्यानंतरही भाजपकडे तीन जागा शिल्लक राहतात. यासाठी विनोद तावडे , सुनील देवधर, विनय सहस्रबुद्धे यांची नावं चर्चेत आहेत. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, माजी मंत्री रानसाहेब दानवे यांचीही नावं शर्यतीत आहेत.

## १० मार्चला पुन्हा गिरणी कामगार विधान भवनावर धडकणार! मुंबईतील सभेतून ठाम इशारा

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.२४, मुंबई :** मुंबई करी रोड, येथे संयुक्त मराठी मुंबई चळवळीच्या वतीने आयोजित गिरणी कामगार व वारसांची भव्य सभा उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडली. सभेतून राज्य सरकारला कडक शब्दांत इशारा देण्यात आला की गिरणी कामगारांच्या पुनर्वसनाचा प्रश्न तातडीने मार्गी न लावल्यास १० मार्च रोजी गिरणी कामगार विधान भवनावर धडक देतील. आश्वासनांची पुनरावृत्ती आता सहन केली जाणार नाही, असा ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला.

सभेत सरकारसमोर स्पष्ट करण्यात आले की गिरणी कामगारांना मुंबईत घर देण्यासाठी स्पष्ट, कालबद्ध व नियोजित आराखडा जाहीर करावा आणि त्यामध्यमातून गिरणी कामगारांना मुंबईतील घराची हमी देणारी इरादापत्रे तात्काळ वितरित करावीत, वंचित गिरणी कामगारांना पुन्हा नव्याने अर्ज करण्याची एक संधी देण्यात यावी, तसेच १९८१च्या संपातील गिरणी कामगारांनाही सदनिकेच्या प्रकल्पामध्ये सामावून घेण्यात यावे.

पुनर्वसनासाठी उपलब्ध पर्यायांबाबत सभेत नमूद करण्यात आले की सुमारे ६०० एकर सॉल्ट लँड (खार जमीन), १२१ एकर एनटीसीची जमीन, बीपीटी येथील कापसाच्या गोदामांची जमीन, तसेच संक्रमण शिबिरांतील सुमारे ६ ते ६.५ हजार घरे गिरणी कामगारांसाठी वापरता येऊ शकतात. महाराष्ट्र शासन, म्हाडा व इतर संस्थांचे मुंबईतील सध्या सुरू असलेले ५६ पुनर्वसन प्रकल्प, तसेच धारावी व बीडीडीसारख्या मोठ्या प्रकल्पांमध्येही गिरणी कामगारांचे पुनर्वसन शक्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले. रमाबाई नगर प्रकल्पात सुमारे १८ हजार घरे नियोजित असूनही गिरणी कामगारांसाठी स्वतंत्र आराखडा जाहीर झालेला नाही, याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.



संयुक्त मराठीचे युवा नेतृत्व रमाकांत बने यांनी सांगितले की पुनर्वसनासाठी पर्याय उपलब्ध असताना अंमलबजावणी टाळणे अन्यायकारक आहे. सरकारने तातडीने निर्णय न घेतल्यास १० मार्चचा मोर्चा निर्णायक ठरेल.

सभेला अरुण निंबाळकर, बबन मोरे, सुनील साळुंखे, मारुती दळवी, संघटनेचे अध्यक्ष विवेकानंद बेळुसे, रमाकांत बने यांनी मार्गदर्शन केले तसेच श्याम कबाडी, रवींद्र ताम्हाणकर , शिवराम जाधव, रवींद्र गवळी, प्रवीण कदम, हरिशचंद्र करगळ, प्रज्ञा कदम, मधुकर साठे, सिद्धनाथ चव्हाण आणि मोठ्या संख्येने गिरणी कामगार उपस्थित होते.

सभा संघर्षाच्या निर्धाराने संपन्न झाली असून गिरणी कामगारांना मुंबईत घर मिळेपर्यंत लढा अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## बल्लारपुरात जिल्हाधिकाऱ्यांनी जाणून घेतल्या समस्या

### उपविभागीय अधिकारी कार्यालयात जनता दरबार

### नागरिकांच्या समस्या निवारण करण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, विसापूर (चंद्रपूर) :** नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या, त्या समस्याचे निवारण करण्याच्या अनुषंगाने आज मंगळवार (दि.२४) रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयात जनता दरबार जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी तब्बल पन्नास जणांच्या समस्या तातडीने निकाली काढण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तत्पूर्वी जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.यांनी सर्व कार्यालय प्रमुख यांचे कडून तालुक्यातील प्रलंबित कामकाजाचा आढावा घेऊन विकास कामे मार्गी लावण्यासाठी उपाययोजना करण्याचे संबंधित अधिकाऱ्यांना सुचित केले. त्यानंतर जनता दरबार सुरु करण्यात आला. यावेळी नागरिकांनी शहरातील व ग्रामीण भागातील समस्यांचे निवेदन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.यांनी स्विकारुन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी जवळपास पन्नासवर नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासकीय पातळीवर कारवाई करुन आठ दिवसात जिल्हाधिकारी कार्यालय येथे सुचित करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी बल्लारपूर येथील उपविभागीय अधिकारी अर्जुन पावरा, तहसीलदार रेणुका कोकाटे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी कल्पना क्षीरसागर, प्रकल्प संचालक मंजिरी टकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश धायगुडे, बल्लारपूरचे गटविकास अधिकारी धनंजय साळवे, मुख्याधिकारी न.प. विशाल वाघ यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## मालमत्ता करवाढी विरोधात शिवसेनेतर्फे नगरपालिकेवर मोर्चा



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२४, मीरा भाईंदर :** दि.२४ रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर मुख्य कार्यालयात भीक मागो आंदोलन करण्यात आले. शिवसैनिक पालिकेत घुसू नये म्हणून पालिकेचे दरवाजे बंद करण्यात आले. पोलीस बंदोबस्त ही मोठ्या प्रमाणावर ठेवण्यात आले होते तरी, शिवसैनिक महिला व पुरुषांच्या उग्र आंदोलने पालिकेच्या सुरवातीचा दरवाजा हलवून हलवून उघडन्यात आला व पालिका कार्यालयासमोर घोषणा देऊन परिसर दंडावून सोडला. निशा नार्वेकर, सचिन मांजरेकर व इतर नेते आयुक्तची भेट घेऊन निवेदन दिले व आंदोलन तात्पुरते स्थगित केले.

## सिन्नरहून रागाने घर सोडून आलेली १३ वर्षीय मुलगी राहुरीत आढळली

### ऑपरेशन मुस्कान अंतर्गत राहुरी पोलिसांची तत्पर कारवाई

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२४, राहुरी :** सिन्नर येथून रागाच्या भरात घरातून निघून आलेल्या १३ वर्षीय अल्पवयीन मुलीला कोणताही अनर्थ घडण्यापूर्वीच राहुरी पोलिसांनी शोधून काढत तिच्या आई-वडिलांच्या स्वाधीन केले. ही घटना दि. २२/०२/२०२६ रोजी रात्री सुमारे ८.०० वाजण्याच्या सुमारास घडली असून, पोलिसांच्या सतर्कतेमुळे एक मोठी दुर्घटना टळली आहे.

राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत नियमित पेट्रोलिंग करत असताना पोलीस अंमलदार प्रमोद ढाकणे व नदीम शेख यांना राहुरी बसस्थानक परिसरात एक अल्पवयीन मुलगी संशयास्पद अवस्थेत फिरताना दिसली. तिच्या चेहऱ्यावर भीतीचे व भेदरलेले भाव दिसत असल्याने पोलिसांनी तत्काळ तिची विचारपूस केली. चौकशीदरम्यान ती सिन्नर येथून रागाच्या भरात घरातून निघून आल्याचे तिने सांगितले.

पोलिसांनी मुलीला सुरक्षितपणे राहुरी पोलीस स्टेशन येथे आणून तिच्याकडून नातेवाईकांची माहिती घेतली. तिने वडील सिन्नर येथे राहत असल्याचे सांगितल्यानंतर पोलिसांनी तात्काळ सिन्नर एमआयडीसी पोलीस स्टेशनशी संपर्क साधून माहिती दिली. संबंधित पोलीस ठाण्याच्या माध्यमातून मुलीच्या वडिलांशी संपर्क साधण्यात आला. मुलगी त्यांचीच असल्याची खात्री झाल्यानंतर ते तातडीने राहुरी येथे दाखल झाले. विशेष म्हणजे, सदर प्रकरणात कोणताही मिसिंग अथवा अपहरणाचा गुन्हा दाखल होण्यापूर्वीच पोलिसांनी मुलीला सुखरूप पालकांच्या ताब्यात दिले.

ही कारवाई मा. सोमनाथ घार्गे (पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर), मा. सोमनाथ वाघचौरे (अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर), तसेच मा. जयदत्त भवर (उपविभागीय पोलीस अधिकारी, श्रीरामपूर विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक



संजय आर. ठेंगे यांच्या नेतृत्वात पार पडली. या मोहिमेत पोसई गणेश वाघमारे, पोलीस हवालदार संजय राठोड, बाबासाहेब शेळके, पोलीस कॉन्स्टेबल कोळी, प्रमोद ढाकणे, सतीश कुराडे, नदीम शेख, सचिन ताजने व गणेश लिपने यांनी सहभाग घेतला.

राहुरी पोलिसांकडून राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन मुस्कान' अंतर्गत आतापर्यंत १०६ अल्पवयीन मुलींचा शोध लावण्यात आला असून, या तत्पर कारवाईबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्यांसह नागरिकांकडूनही राहुरी पोलिसांचे कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

# पुढच्यास दंड, मागचा शहाणा!

रस्त्यावर आणि विशेषतः सिग्नलवर नियमभंग करणाऱ्यांना 'तिसऱ्या डोळ्या'ने आवर घालायला सुरुवात केली अन् नाशिकमध्ये एकच गहजब उडाला. 'ई-चलान' ठोठावण्याचा प्रायोगिक तत्त्वावरील प्रकल्प ठराविक सिग्नल्सवर सुरू झाल्यानंतर पहिल्या आठ तासांत सुमारे १७ हजार वाहनचालकांनी सिग्नल 'ब्रेक' केल्याचे आढळले. म्हणजे ताशी दोन हजारपेक्षा अधिक, तर दर मिनिटाला सुमारे तेहतीस लोकांनी वाहतूक नियमांना बगल दिली. आठ दिवसांत असे अडीच लाख वाहनचालक हुडकून काढले गेले. एकट्या नाशिक शहरात अवघ्या काही तासांत अशी स्थिती दिसत असेल, तर राज्याचा आकडा किती मोठा असू शकेल? सविनय कायदेभंग चळवळीचा देशाला मोठा इतिहास असल्याने की काय, लोक आजही असा 'कायदेभंग' करीत असावेत! वाहनधारकांच्या विनयाबद्दल मात्र अधिक न बोललेलेच बरे!!

महापालिका निवडणुकीपूर्वी 'नाशिक जिल्हा, कायद्याचा बालेकिल्ला' या मोहिमेने अचानक प्रसिद्ध पावलेल्या नाशिक पोलिसांचा आत्मविश्वास उंचावलेला दिसतो. आता त्यांनी बेशिस्त वाहनचालकांना वठणीवर आणण्याचा विडा पुन्हा एकवार उचलला आहे. शहरात सिग्नल्सवर बसविलेल्या बाराशे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा 'फीड' थेट पोलिस मुख्यालयातील वाहतूक विभागाला मिळू लागल्याने नियमभंग करणाऱ्यांना शोधणे सहज शक्य होत आहे. तसा हा प्रकल्प मागील कुंभमेळ्यातच उभा राहणार होता. परंतु, कॅमेऱ्यांच्या अनुपलब्धतेमुळे तो प्रत्यक्षात येऊ शकला नव्हता. आता स्मार्ट सिटी योजना व पोलिस दल अशा दोहोंचे कॅमेरे बेशिस्तांवर नजर ठेवून आहेत. मुंबई-पुण्यानंतर नाशिकमध्ये 'लाइव्ह फीड'चीही व्यवस्था सुरू झाली असली, तरी अनेक महत्त्वाच्या शहरांत ती आजही नाही. नागपूरमध्ये कॅमेरे लावले असले, तरी त्यातले सुमारे पन्नास टक्के बंद अवस्थेत आहेत.

लोकांना वाहतुकीचे नियम पाळण्यास भाग पाडणाऱ्या आणि रस्ते अपघातांना आळा घालून लोकांचे जीव वाचवू पाहणाऱ्या या मोहिमेचे स्वागतच. परंतु, यानिमित्ताने रस्त्यांवरचे खड्डे आणि कडेला ठाण मांडून असलेल्या अतिक्रमणांचे काय, यांसारखे काही प्रश्नही जनमानसाचा आरसा असलेल्या समाजमाध्यमांवर उपस्थित होत आहेत. पार्किंगसाठी जागा नसल्याने वाहने रस्त्यावर लागतात. त्यामुळे अपघात घडून काही जखमी होतात, तर काही जिवानिशी जातात. या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांनी ऑनलाइन कारवाईच्या प्रसृत केलेल्या दृश्यफितीवर लोक अक्षरशः तुटून पडले. लाखोंचा दंड गोळा करण्याचे नव्हे, तर वाहतुकीला शिस्त लावण्याचे 'टार्गेट' ठेवा, असे खडे बोल सुनावले गेले. 'भर रस्त्यातल्या खोदकामासाठी कंत्राटदारांना दंड करण्याचे धारिष्ट्य दाखविणार का'; 'आधी पार्किंगची सुविधा द्या, मग खुशाल कॅमेरे लावून दंडाच्या पावत्या फाडा', अशा प्रतिक्रिया चुकीच्या तरी कशा म्हणायच्या? हेल्मेट कारवाई तीव्र झाल्यानंतरही असेच सवाल उपस्थित करण्यात आले होते. त्यामुळे पोलिसांना नमते घ्यावे लागले होते. नाशिकचा खडकाळी सिग्नल जगप्रसिद्ध आहे. तेथील बेशिस्तीचे दाखले अगदी दुबईतसुद्धा दिले जातात. येथून जाणारे लोक दुबईत मात्र काटेकोरपणे नियम पाळतात. हे असे का, याचे उत्तर ज्याने-त्याने शोधायला हवे. वास्तविक, शिस्त वा नियम पाळणे हा संस्कारांचा सुद्धा भाग असतो. परंतु, कधी कधी ती लावण्यासाठी कठोर नियमावली आवश्यक च असते. राज्यभरात मिळून पाच-दहा हजार सिग्नल सहज असतील. तरी राजधानी मुंबई असो, की नाशिक-सोलापूरसारखी शहरे; प्रत्येक ठिकाणी शिस्तभंगाची प्रथाच पडली आहे. वाहतुकीचा बोजवाराही ठरलेला. एकाने सिग्नल तोडला की दुसरा तोच कित्ता गिरवतो आणि मग नियम मोडण्यासाठी जणू रांगच लागते. या वृत्तीनुसार एकावर कारवाई झाले की बाकीचे सरळ होतात, हे खरेच. म्हणून या मोहिमेला पाठिंबाच; पण खोदलेले रस्ते, त्यातले खड्डे, वाढलेली अतिक्रमणे, संयमाचा अंत पाहणारी वाहतूक कोंडी या सगळ्यांवर मात करीत माणसे जगण्याच्या लढाईसाठी रस्त्यांवर धावत असतात, याचेही भान पोलिसांनी ठेवावे म्हणजे झाले!

# फुकाचे सल्ले हवेत नकोत !

भारताला प्राचीन सनातन संस्कृतीचा वारसा लाभल्याने आणि या संस्कृतीच्या खुणा आजही देशाच्या अनेक भागांत पाहायला मिळत असल्याने ही संस्कृती जवळून पाहण्यासाठी आणि अनुभवण्यासाठी विदेशातून हजारो पर्यटक दरवर्षी भारतात येत असतात. भारत ही देवतांच्या अवतारांची आणि अध्यात्माची शिकवण देणाऱ्या साधुसंतांची भूमी असल्याने येथे सश्रद्ध समाज मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो. हिंदू धर्मात येणारे विविध सण आणि धार्मिक उत्सव यांच्या निमित्ताने सश्रद्ध समाज आपापसांतील मतभेद विसरून ते एकदिलाने साजरे करतो.

भगवंताच्या प्रेमाची पाखरण करणारे हे सण आणि उत्सव कसे साजरे करावेत याविषयी आपल्या ऋषी मुनींनी सविस्तरपणे लिखाण केले आहे. सणांमागे जशी पौराणिक कथेची पार्श्वभूमी आहे, तसा मानवाच्या संर्वांगीण विकासाचा व्यापक दृष्टिकोनही आहे. त्यामुळे आजही ते साजरे करताना हा भाग आपण लक्षात घेतला पाहिजे. समाजात जसा सश्रद्ध वर्ग मोठ्या प्रमाणात आहे तसा स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणारा नास्तिक वर्गही आहे. हा वर्ग सश्रद्ध वर्गाचा बुद्धीभेद करण्याची, त्यांना धार्मिक गोष्टींपासून परावृत्त करण्याची नेहमीच संधी शोधत असतो. होळी सण जवळ आला कि 'होळी लहान करा, पोळी दान करा', 'झाडे वाचवण्यासाठी लाकडांऐवजी कचऱ्याची होळी करा'. गणेशोत्सव काळात 'गणेश मूर्तींचे विसर्जन करण्याऐवजी तिचे दान करा', यासारखे सल्ले या मंडळींकडून वृत्तपत्रांतून, चर्चासत्रांतून आणि मुलाखतींतून दिले जातात.

मुळात होळीकरीता जाळावयाची लाकडे ही सुकी असावीत असे शास्त्रातही नमूद केलेले आहे त्यामुळे त्यातून पर्यावरणाला कोणताही धोका संभवत नाही. कागदाच्या निर्मितीसाठी दरवर्षी कितीतरी झाडांची कत्तल केली जाते, शहरीकरणाच्या नावाखाली हल्ली सर्रास वृक्षतोड केली जाते यासंदर्भात ही मंडळी कधी साधे अवाक्षरही काढत नाहीत. पर्यावरणाच्या रक्षणासाठी ही मंडळी दरवर्षी किती वृक्ष लावतात यांची आकडेवारी कधी सांगत नाहीत त्यामुळे केवळ होळीच्या निमित्ताने यांना येणारा पर्यावरणाचा पुळका संशयास्पद आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. होळी हा एक धार्मिक सण आहे. होलिका नावाच्या राक्षसीणीला भस्मसात करणाऱ्या अग्निदेवतेचे यावेळी पूजन केले जाते त्यासाठी कचरा जाळण्याचा सल्ला देणाऱ्यांच्या बुद्धीची किव करावी तेव्हढी थोडीच आहे. कचरा जाळण्याचा सल्ला देणारी ही मंडळी रस्त्यावर कचरा होऊ नये किंवा गोळा होणाऱ्या कचऱ्याची वेळच्या वेळी विल्हेवाट लावली जावी यासाठी कधी काही प्रयत्न करतात का ? कचरा गोळा होताच क्षणी जाळावा त्यासाठी होळीची कशाला वाट पाहावी ? मुळात नास्तिक प्रवृत्तीची ही मंडळी श्री गणेशमूर्ती विसर्जनाने प्रदूषण होते सांगून गणेश मूर्तींचे दान घेतात आणि याच मुर्त्या खाणी बुजवण्यासाठी वापरतात याबाबतच्या बातम्याही मध्यंतरी प्रसिद्ध झाल्या होत्या. ज्या देवतेला वाजतगाजत आपण आपल्या घरी आणतो.

गणेश उत्सव काळात तिचे मनोभावे पूजन करतो, त्याच मूर्तीची होणारी अवहेलना आपण कशी काय पाहू शकतो ? महाशिवरात्री जवळ आली की 'दूध शिवपिंडीवर वाहून वाया घालवण्यापेक्षा एखाद्या गरिबाला द्या' अशा आशयाचे संदेश या मंडळींकडून सामाजिक माध्यमांमध्ये पसरवले जातात. व्याख्यानांतून सुद्धा हेच विषय मांडले जातात. खरेतर शिवलिंगावर अर्पण केलेले दूध कोणत्याही शिव मंदिरात असेच वाया न घालवता ते भाविकांना तीर्थ स्वरूपात वाटले जाते. शिवलिंगावर अर्पण केलेल्या दुधाचे तीर्थात रूपांतर झाल्यावर शिवलिंगाच्या चैतन्यामुळे त्याच्या चवीत होणारा आमूलाग्र बदल प्रत्येक शिवभक्ताने अनुभवलेला असतो. नास्तिक मंडळीना मात्र हे सहन होत नसल्याने सामान्य शिवभक्तांचा बुद्धिभेद करण्यासाठी या दरम्यान दूध दान करण्याचे संदेश बनवून सामाजिक प्रसारमाध्यमांतून पाठवले जातात.

हिंदूंच्या सण उत्सवातील प्रथा परंपरांना आणि धर्मशास्त्रीय विधींना अंधश्रद्धेचे लेबल चिकटवून त्यावर आपली बुद्धी पाजळणारी ही मंडळी अन्य धर्मियांच्या सणांच्या वेळी मात्र मूग गिळून गप्प असतात. दूध दराच्या मागणीसाठी राज्यभर उभारण्यात आलेल्या आंदोलना दरम्यान आंदोलकांकडून लक्षावधी लिटर दूध ओतून वाया घालवले जाते तेव्हा मात्र यांच्यापैकी कुणीच त्यांना सल्ले देताना आढळत नाही. त्यामुळे या मंडळींनी केवळ हिंदूंचे सण-उत्सव जवळ आले की असले फुकाचे सल्ले देऊ नयेत.

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

# व्हॉट्सअप वाढदिवस!




आजचे युग हे सोशल मिडियाचे युग आहे आणि या सोशल मीडियाच्या युगात प्रत्येकाच्या मोबाईल मध्ये अनेक मेसेजिंग ॲप्लिकेशन आहेत आपणही दररोज अनेक मेसेजिंग ॲप्लिकेशनचा वापर करतो. या मेसेजिंग ॲप्लिकेशनमध्ये सर्वाधिक लोकप्रिय आणि सर्वाधिक वापरले जाणारे मेसेजिंग ॲप्लिकेशन म्हणजे व्हाट्सअप. याच सर्वाधिक लोकप्रिय आणि वापरले जाणाऱ्या व्हॉट्सअप या मेसेजिंग ॲप्लिकेशनचा आज वाढदिवस आहे. व्हॉट्सअप हा आज परवलीचा शब्द झाला आहे. आज प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये दुसरे कोणते ॲप्लिकेशन असो वा नसो पण व्हॉट्सअप हमखास बघायला मिळते. २४ फेब्रुवारी २००९ रोजी जेन कॉम याने व्हाट्सअप ळपल नावाची कंपनी स्थापन केली. व्हाटसअपचा निर्माता जेन कॉम याचा जन्म युक्रेन देशातील छोट्या गावात झाला. त्याचे वडील मजूर तर आई गृहिणी होती.

युक्रेनमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाल्यावर त्याचे वडील अमेरिकेत स्थलांतरित झाले. तिथे ते छोटीमोठी कामे करू लागले. जेन कॉम याला कॉम्प्युटर प्रोग्रामिंगची आवड होती. त्याच्या घराजवळच एक लायब्ररी होती. तेथून तो कॉम्प्युटर प्रोग्रामिंगचे पुस्तके आणत व घरच्या कॉम्प्युटरवर प्रोग्रामिंग करीत. पुढे त्याने कॉम्प्युटर सायन्समध्ये डिग्री मिळवून एका सॉफ्टवेअर कंपनीत सिक्युरिटी टेस्टर म्हणून काम सुरू केले. १९९७ साली याहू कंपनीने इन्फ्रास्ट्रक्चर इंजिनिअर या पदावर त्याची नेमणूक केली. या कंपनीत त्याने ९ वर्ष नोकरी केली. दुसऱ्या कंपनीत नोकरी करण्यापेक्षा स्वतःची कंपनी सुरू करावी या विचाराने त्याने याहूला राजीनामा दिला. याहूमध्ये ब्रायन अकटन हा त्याचा सहकारी होता. त्यानेही याहूला राजीनामा दिला. दोघांनी मिळून स्वतःची कंपनी स्थापन करण्याचे ठरवले. त्या सुमारास ॲप्पल कंपनीने आयफोन बाजारात आणला होता. त्यात मेसेज पाठवण्याची सुविधा होती. त्यावरून त्यांना व्हॉट्सअपची कल्पना सुचली. पुढे दोघांनी त्यावर काम करण्यास सुरवात केली. या प्रयोगात त्यांना यश मिळाले का नाही हे विचारण्यासाठी त्यांच्या मित्राने त्यांना विचारले व्हॉट्सअप ! व्हॉट्सअप या शब्दाचा अर्थ होतो काय झाले ? हा शब्द कानावर पडता क्षणीच त्यांनी ठरवले आपल्या कंपनीचे नाव आपण व्हॉट्सअप हेच ठेवायचे. २४ फेब्रुवारी २००९ रोजी त्यांनी व्हॉट्सअप ळपल नावाची कंपनी स्थापन केली. सुरवातीला व्हॉट्सअपला खूपच कमी प्रतिसाद मिळाला कारण तेंव्हा अँड्रॉइड मोबाईलची संख्या खूप कमी होती पण जशी अँड्रॉइड मोबाईलची संख्या वाढत गेली तशी व्हॉट्सअप वापरणाऱ्यांची संख्याही वाढत गेली.

आज व्हॉट्सअप जगातील पहिल्या क्रमांकाचे एप्लिकेशन बनले आहे. जगातील किमान दोनशे कोटीहून अधिक लोक व्हॉट्सअपचा वापर करतात. प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये व्हॉट्सअप असतेच. व्हॉट्सअपवर रोज एक लाख कोटीहून अशिक मेसेज सेंड होतात. व्हॉट्सअप वरुन दररोज ५०० कोटीहून अधिक फोटो तसेच १०० कोटीहून अधिक व्हिडीओ शेअर होतात. सुरवातीला फक्त इंग्रजीमध्ये असणारे व्हॉट्सअप आज ५३ भाषांमध्ये आहे. व्हॉट्सअप नेहमीच नवनवीन सुविधा वापरकर्त्यांसाठी उपलब्ध करुन देते. व्हिडिओ कॉल, ऑडियो कॉल, स्टेटस अशा नवनवीन सुविधा व्हॉट्सअप कडून वापरकर्त्यांना देण्यात आल्या आहेत. आज व्हॉट्सअप वरून पैसेही पाठवता येऊ शकतात. २०१४ साली फेसबूकच्या मार्क झुकेरबर्ग याने १९ बिलियन डॉलरला जेन कॉम आणि ब्रायन अकटन यांच्याकडून व्हॉट्सअप खरेदी केले. आज व्हॉट्सअपची मालकी मार्क झुकेरबर्ग यांच्याकडे आहे. आज व्हॉट्सअप प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. आपली दिवसाची सुरुवात व्हॉट्सअपनेच होते. सकाळी झोपेतून उठल्यावर आपण जर पहिल्यांदा काय पाहत असतो तर ते व्हॉट्सअप !आपण झोपताना ही व्हॉट्सअप पाहूनच झोपतो. व्हॉट्सअप वर ग्रुपची सुविधा सुरू झाल्याने एकाच वेळी शेकडो लोकांना मेसेज पाठवण्याची सुविधा निर्माण झाली. व्हॉट्सअप वर आज कोयावधी ग्रुप आहे. केवळ मित्रांचे नातेवाईकांचे च नाही तर शासकीय नोकरांचे देखील ग्रुप आहे. शासकीय संदेश, आदेश देखील आता व्हॉट्सअप वर दिले जातात.

**लहान मुलांपासून थोरांपर्यंत सर्वांच्या जीवनाच्या अविभाज्य भाव बनलेल्या व्हॉट्सअपला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!**

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# पत्रकार रविंद्र खाडे यांच्या पत्राची दखल...




**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.२४, शहापूर (ठाणे) :** चेरपोली - बामणे ग्राम पंचायत हद्दीत वाढलेल्या अस्वच्छता व मच्छरांच्या समस्येबाबत शिवसेना सोशल मीडिया प्रमुख व पत्रकार रविंद्र खाडे यांनी ग्रामपंचायतीकडे लेखी तक्रार सादर केल्यानंतर प्रशासनाने तात्काळ कारवाई करत गटार साफसफाईच्या कामाला सुरुवात केली आहे.

ग्रामपंचायत कार्यालय परिसर तसेच गावातील विविध भागांमध्ये उघडी व तुंबलेली गटारे अनेक दिवसांपासून स्वच्छ न केल्याने सांडपाणी साचले होते. परिणामी मोठ्या प्रमाणात मच्छरांची उत्पत्ती होऊन डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यांसारख्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला होता. या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधत रविंद्र खाडे यांनी मा.प्रशासक व ग्रामसेवक यांना निवेदन देत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली होती.

पत्रात सर्व तुंबलेली गटारे स्वच्छ करणे, नियमित स्वच्छता मोहीम राबवणे तसेच मच्छर निर्मूलनासाठी तातडीने फॉगिंग करण्याची मागणी करण्यात आली होती. अन्यथा उच्चस्तरीय प्रशासनाकडे तक्रार करण्याचा इशाराही देण्यात आला होता. निवेदनाची दखल घेत ग्रामपंचायतीने साफसफाई मोहिमेला सुरुवात केली असून साचलेले पाणी काढणे, कचरा हटविणे आणि गटारे मोकळी करण्याचे काम सुरू झाले आहे. तसेच औषध फवारणी करण्याबाबतही तयारी सुरू असल्याचे समजते.

ग्रामस्थांनी या कारवाईचे स्वागत केले असून गावात नियमित स्वच्छता राखून भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# अमर्त्यभाव

गलबलून जाय मन
मांडता शोकप्रस्ताव
परिसरावरभारावला
दुःखाचा पूर्ण प्रभाव

गेला त्याचा जाणवी
हरेकजणांस अभाव
पोकळी खरी कळते
कसा लागेलं निभाव

सगळेबोलती चांगले
भला होता रे स्वभाव
आता सुयोग्य वाटती
त्यांचेतसे रे हावभाव

असल्यानसल्यागुणा
शब्दांत मिळतो वाव
सत्य मांडतात सगळे
आयुष्यअसे धूपछाव

श्ध्दांजली भाषणांने
अंतरात्म्या घेतो ठाव
अस्वस्थ हो सभागृह
मृत्यूने घातलाय घाव

अमूकतमूकरस्त्यास
द्यायचे मयताचे नाव
विरोधी देई अनुमती
एकमताने पासठराव

टिकाकार करी स्तुती
कधीकधी वाटे बनाव
विसरून जाती सगळे
अमर राहे अमर्त्यभाव

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

